**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर**

वाचा : 1. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक –ईएसटी-2010/प्र.क्र.42/ई-8 दि.06.04.2011.
2. महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक –ईएसटी-2010/प्र.क्र.42/ई-8 दि.30.07.2011.
3. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-2016/प्र.क्र.107/ई-8 दि.15.09.2017.

शासन महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-ईएसटी-2010/प्र.क्र.42/ई-8, दिनांक 06/04/2011 व समक्रमांकाचे निर्णय दिनांक 30/07/2011 मधील तरतुदीनुसार विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने एका वेळी 11 महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाचे असुन, त्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन विहीत नमुन्यात दिनांक:- 10 / 01 /2025 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.
************************************************************************************************

| | | |
|---|---|---|
| पदांचे नांव | :- | विधी अधिकारी |
| पद संख्या | :- | 01 (एक) |
| मासिक वित्तलब्धी | :- | एकत्रित मानधन रू.30000/- + दुरध्वणी व प्रवास खर्च |
| | :- | रू. 5000/- असे एकत्रित मानधन रू.35000/- प्रति महिना. या व्यतिरीक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत. |

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

1. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदविधार असेल. तो सनद धारक असेल.
2. विधी अधिकारी या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान सात वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
3. उमेदवार महसुल विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती व विभागीय चौकशी इत्यादि बाबत ज्ञान संपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो सक्षतेने पार पाडू शकेल.
4. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.
5. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी 45 वर्षापेक्षा जास्त नसेल.

**विधी अधिकारी यांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

1. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक बाबीबाबत / न्यायालयीन प्रकरणे सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. महसुल विषयक / परिच्छेद निहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे / सेवा विषयक / प्रशासकीय बाबी/ विभागीय चौकशी इत्यादि तथा समकालीन कायद्याची प्रस्थापीत स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
3. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे. जिथे मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, व मा. जिल्हा व सत्र न्यायालय अथवा इतर कोणत्याही न्यायालयत, शासन / जिल्हाधिकारी प्रतिवादी आहे, अशा सर्व प्रकरणात सादर करावयाची परिच्छेदनिहाय अहवाल व प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिकाऱ्याच्या मदतीने तयार करणे.
4. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवुन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल, हे पाहणे.

5. जिथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयांचा अभ्यास करून तदनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
6. अपिल प्रकरणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करून तो संबंधीत सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागे पर्यंत पाठपुरावा करणे.
7. वेळोवेळी जिल्हाधिकारी / शाखा प्रमुख / इतर कोणत्याही सक्षम अधिकाऱ्यांनी विधी विषयक कामकाजाबाबत व नेमुण दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

**नेमणुकीचे स्वरूप :-**

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक –ईएसटी-2010/प्र.क्र.42/ई-8 दिनांक.30.07.2011. नुसार

1. विधी अधिकारी यांची निवड जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहील. तसेच जिल्हाधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी असतील.
2. विधी अधिकारी हे पद नियमीत स्वरूपात नसुन 11 महिन्यांकरीता कंत्राटी तत्वावर भरण्यात येईल.
3. 11 महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत 11 महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त 3 वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्यांचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोर जावे लागेल.
4. सदर पदाची नेमणुकही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल व विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाहीत व नंतर शासनाव्दारे वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेतले गेल्यास ते विधी अधिकारी यांना बंधनकारक राहील.

**पदभरतीबाबत कार्यक्रम :-**

1. अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख :- 10 / 01/2025
2. पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे :- 14/ 01/2025
3. प्रसिध्द केलेल्या यादीमधील चुकीबाबत उमेदवारांनी कार्यालयामध्ये समक्ष लेखी अर्ज करण्याची अंतीम तारीख :- 16/01/2025
4. झालेल्या चुकांची दुरूस्ती करून पात्र अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे :- 17/01/2025
5. उमेदवारांची प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत अथवा दोन्ही घेण्याची सुचना दिनांक 20/01/2025 रोजी कार्यालयाचे सुचना फलकावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येइल.

**आवश्यक सुचना :-**

1. वरील शैक्षणीक पात्रता व अनुभवामधील अनुक्रमांक 1 ते 5 बाबतची सर्व कागदपत्रे प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

2. सदर जाहिरात व सदर पदाकरीता विहीत नमुन्यातील अर्ज, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र या कार्यालयाचे http//:chandrapur.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
3. उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज A4 आकाराच्या कागदावर एका बाजुस टंकलिखीत / संगणीकृत करून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर या पत्त्यावर दिनांक 10/ 01 /2025 पर्यंत सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत सादर करावे. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
4. उमेदवाराचे अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.
5. उमेदवारांचे प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यक वाटल्यास लेखी चाचणी अथवा प्रत्यक्ष मुलाखत (तोंडी) अथवा दोन्ही घेण्यात येईल. याबाबतची सुचना दिनांक 20/01 /2025 रोजी संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर लावुन प्रसिध्द करण्यात येईल.
6. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराचे नांव यथावकाश कार्यालयाचे सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
7. निवड झालेल्या उमेदवाराने विहीत नमुन्यातील करारनामा करून देणे बंधनकारक आहे. करारनामा करून दिल्यानंतर निवड झालेल्या उमेदवारास कंत्राटी पध्दतीने नेमणुककरीता असल्याचे आदेश देण्यात येईल.
8. कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी या पदावर नेमणुक झालेल्या उमेदवारास त्यांचे नेमणुकीचे पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पारा पाडाव्या लागतील.
9. या प्रक्रीयेमध्ये बदल करण्याचा स्थागीत / रद्य करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, चंद्रपूर यांना राहील.

**इतर आवश्यक अटी:-**

1. विधी अधिकारी (कंत्राटी) या पदाकरीता अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांवर फौजदारी गुन्हा, तसेच कोणत्याही संबंधाने गुन्हा नोंद नसावा.
2. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.
3. या निवड प्रक्रियेमार्फत निवड झालेल्या उमेदवारांना या निवडीच्या आधारावर भविष्यात स्थायी शासन सेवेत सामावून घेण्याचा अधिकार राहणार नाही व त्याबाबतचे कोणतेही विनंती अर्ज विचारात घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.
4. विधी अधिकारी यांचे काम असमाधानकारक असल्याचे निष्पन्न झाल्यास किंवा त्यांचे विरूध्द तक्रार प्राप्त झाल्यास त्यांना कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांची तात्पुरत्या स्वरूपातील नेमणूक रद्य करण्यात येईल.
5. विधी अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर, इतर खाजगी कामे करता येणार नाही.

स्थळ:- चंद्रपूर
दिनांक:- 30 / 12/2024

(विनय गौडा जी सी)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती, चंद्रपूर